**प्रेसनोट** दि.२३/०६/२०१९

## बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## बिबवेवाडी पोलीसांनी हरवलेल्या मुलाचा घेतला अवघ्या आर्धा तासात शोध

आज दि.२३/०६/२०१९ रोजी बिबवेवाडी पोलीस ठाणेस महिला नामे डॉ. शुभांगी योगिराज सुतार रा.अनिकेत वेल्डिंग दत्त मंदीरामागे महेश सोसायटी चौक यांनी कळविले कि, त्यांचा मुलगा नामे अखिलेश सुतार वय ०३ वर्षे हा त्या महेश सोसायटी चौक येथे भाजी खरेदी करीत असताना त्यांचा हात सुटून तो कोठे तरी निघुन गेला आहे. त्याचा इतरत्र शोध घेतला असता तो मिळुन आला नाही वगैरे हकिगत सांगितल्याने बिबवेवाडी पोलीस ठाणे येथे एस.एच.ओ. म्हणुन कर्तव्यास असलेले पोलीस उप निरीक्षक अतुल थोरात यांनी लागलीच ठाणे अंमलदार व बिबवेवाडी मार्शलला मदतीस बोलावुन घटनास्थळी जावुन सदर मुलाचा मोबाईल मधील फोटो व्दारे शोध घेत असताना सदर मुलगा भारत ज्योति बस स्टॉप बिबवेवाडी येथे रडत असल्याचे दिसल्याने त्यास ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन त्याचे आई-वडीलांकडे अधिक चौकशी करुन सदर मुलास सुखरुप अवघ्या आर्धा तासात त्यांचे ताब्यात दिल्याने त्यांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक श्री अतुल थोरात, पोलीस हवालदार आलाटे, पोलीस नाईक पाटोळे, पोलीस शिपाई डोळसे यांनी केली आहे.

